# ठाणे महानगरपालिका, ठाणे
# राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
# जाहिरात

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या आस्थापनेवर विविध संवर्गातील रिक्त असलेली पदे सहा महिन्याच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा, ठाणे येथे दिनांक २७ / ०९ / २०२१ रोजीसकाळी ११.३० वाजता थेट मुलाखतीस [Walk in Interview]उपस्थित रहावे.

सर्व कादपत्रे मुलाखतीचे वेळी दोन प्रती मध्ये सादर करावीत, कागदपत्रे नसणारे उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता पूर्ण व अनुभवाची पूर्तताकरणाऱ्या उमेदवारांचीच फक्त मुलाखत घेतली जाईल.

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालया करिता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुत्या स्वरुपात ६ महिने कालावधी करीता खालील नमुद केलेले पद भरावयाचे आहे. त्यांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे.तसेच सदर पदाची आवश्यक माहिती www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा मानधन | वय |
|---|---|---|---|---|---|
| १) | **वैद्यकीय समाजसेवा अधिक्षक (MSW)**<br>अनु.जाती - ०१<br>इ.मा.व - ०१<br>खुला - ०१ | ३ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची मास्टर इन सोशल वर्कर ही पदवी उत्तीर्ण<br>२) शासकीय/निमशासकीय रुग्णालयात कामकेल्याचा ३ वर्षाचा अनुभव. | ३०,०००/- प्रतिमहा एकत्रित मानधन | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसारखुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |
| २) | **आरोग्य निरिक्षक**<br>इ.मा.व - ०१<br>खुला - ०२ | ३ | १) शासन मान्य संस्थेकडील स्वच्छता निरिक्षककोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये काम केल्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव. | २५,०००/- प्रतिमहा एकत्रित मानधन | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसारखुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |
| ३) | **सी.एस.एस.डीसहायक**<br>अनु.जाती -<br>अनु.जमाती - ०१<br>इ.मा.व -<br>वि.जा.भ.ज. - ०१<br>खुला - ०१ | ०३ | १) शासन मान्य संस्थेकडील ITI, मशिननिस्ट, NCTVT परिक्षा उत्तीर्णव बारावी पास<br>२) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये CSSD विभागा मध्ये काम केल्याचा किमान २ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. | २०,०००/- प्रतिमहा एकत्रित मानधन | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसारखुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |
| ४) | **औषध निर्माण अधिकारी** | ०३ | मान्यता प्राप्त संस्थेतील D.Pharma/B.PharmCourse | १५,०००/- प्रतिमहा | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/का |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | इ.मा.व - ०१<br>वि.जा.भ.ज. - ०१<br>खुला - ०१ | | २) शासकीय निमशासकीय अथवा नामांकित रुग्णालयातील काम केल्याचा किमान २ वर्षाचा (१०० + खाटा) अनुभवास प्राधान्य | एकत्रित मानधन | र्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसारखुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |
| ५) | **नाभिक**<br>अनु.जाती - ०१ | ०१ | १) ८ वी पास शासकीय/निमशासकीय संस्थे मध्ये काम केल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव. | १५,०००/- प्रतिमहा एकत्रित मानधन | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसारखुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |

**महत्वाची सूचना:-**

१) उमेदवाराने अर्ज भरताना शैक्षणिक अर्हते मधील गुणांची टक्केवारी, अनुभवाचा कालावधी इत्यादी माहिती बिनचूक भरावी. अर्ज भरण्यास चूक झाल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

२) अनुभवाची गणना करताना शासकीय/नियमशासकीय, स्थानिक संस्थेकडील कामकाजाचा अनुभव हा ६ महिन्यापेक्षा जास्त अनुभवासाठी प्रथम ६ गुण असे धरण्यात येतील. प्रति तीन महिन्यासाठी १.५ असेगुण धरण्यात येईल. तीन महिन्याच्या आतील अनुभव विचारात घेतला जाणार नाही. जास्तीत जास्त गुण हे २० असतील.

३) अनुभवाच्या अटीची पूर्तता करणारे उमेदवार मुलाखतीस नसल्यास नवोदित उमेदवारांची नेमणूक केली जाईल.

४) उमेदवारांना मिळालेले गुण जर समान असतीलतर वयाने जेष्ठ उमेदवारास प्राध्यान्य देण्यात येईल.

५) उमेदवारानी मुलाखातीस दिनांक २७/०९/२०२१ रोजीसकाळी ११:०० वाजेपर्यंत नाव नोदणीसाठी अर्ज व मुळ कागदपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज मुलाखातीस ग्राहय धरले जाणार नाही.

**अटी व शर्ती**

१) जाहिराती मध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) निवड झालेल्या उमेदवारांची यादीठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती मुलाखतीचे वेळी मुळ दाखल्यासह सादर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

४) उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५) मुलाखतीचे दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादे मध्ये असणे आवश्यक आहे.

६) स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूदकरण्यात यावा.

७) उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

८) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली अथवा मुलाखतीस उपस्थित राहीला म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

९) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

१०) एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

११) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केलल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्दकरण्यात येईल. तसेच शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१२) जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखलाही मुळ कागदपत्रासह सादर करावित.

अ) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, वास्तव्याचा पुरावा व अनुभव या कागदपत्रांचा संच व या संचाची स्वसाक्षांकित केलेली एक झेरॉक्स प्रत सोबत आणावी.

१३) उमेदवारास स्थानिक पोलिस स्टेशनमधून चारीत्र्य व वास्तव्य दाखला निवड झाल्यावर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

१४) निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यात एक हमीपत्र नेमणूक पत्रानंतर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

१५) सदर पदाची मुदत जास्तीत जास्त सहा महिने असेल.

१६) नियुक्त होण्याच्या तारखेचा उल्लेख नेमणूक पत्रात असेल. त्या तारखेपासून सहा महिने मोजले जातील. नेमणूकीच्या अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.

१७) उशिरानेहजरहोणाऱ्यांसाठी अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.

१८) हंगामी (अस्थायी) भरती केलेल्या या पदांवर सरळसेवेने भरती करण्यात आल्यास, सदरचीहंगामी (अस्थायी) नेमणूक रद्द करण्यात येईल/होईल.

१९) सहा महिन्याच्या कालावधीनंतर/अंतिम तारखेनंतर नेमणूकीस मुदतवाढ द्यावी किंवा नव्याने जाहिरात देऊन नेमणूक प्रक्रिया राबवावी याचा निर्णय विभागातर्फे घेण्यात येईल.

२०) गुणानुक्रमा नुसार एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच पात्रतेचे ठरल्यास खालील बाबीनुसार प्राध्यान्यक्रम ठरवला जाईल.

अ) ठाणे शहरात मागील पाच वर्षाहून जास्त वास्तव्याचा पुरावा आवश्यक.

ब) एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्यांचे पांच गुण वजा होतील.

२१) नेमणुक पत्र दिनांकापासून सात दिवसांत प्रत्यक्ष हजर होऊ न शकणाऱ्या/न होणाऱ्या उमेदवारांची नेमणूक रद्द केली जाईल.

अधिष्ठाता
राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय

**वैद्यकीय समाजसेवा अधिक्षक (MSW), आरोग्य निरिक्षक, सी.एस.एस.डी सहायक, औषध निर्माण अधिकारी, नाभिक, पदावर १७९ दिवसांच्या नेमणूकीसाठी अर्ज**

फोटो

१) नावः-

२) वयः- ३)लिंगः-

४) A.वास्तव्याचा पत्ता (पुरावाआवश्यक) B)स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता.

दूरध्वनीक्रमांक मोबाईल नं.

ईमेल

३) शैक्षणिक अर्हता (कागदपत्रे आवश्यक)

| पद | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्णवर्ष | गुण% | प्रयत्न |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

गुणपत्रिका वउत्तीर्ण झाल्याचा दाखला मुलाखतीचे वेळी सादर करावा.

५)अनुभवाचा दाखला आहे/नाही
अ)i)१००वा त्याहून अधिकखाटा असणा-या रुग्णालयातील अनुभव आहे/नाही
ii)सरकारी आस्थापनेतील अनुभव आहे/नाही
(तीन महिन्यांहून कमी कालावधीचा अनुभव ग्राहय नाही)
ब)) अनुभवाचा कालावधी वर्ष महिने

क) सरकारी आस्थापना
A.दवाखाना B.प्रसुतीगृह C.रुग्णालय D. इतर

६)अधिवास प्रमाणपत्र आहे/नाही
७)शाळेचा दाखला(SLC) आहे/नाही
८)जन्म दाखला आहे/नाही

दिनांकः- स्वाक्षरीः-

## हमीपत्र

मी--------------------------------------------------वय वर्ष----------राहणार-------------
-----------------------------------------या हमी पत्राद्वारे जाहिर करतो/करतो की,---------------------
--------पदावरील नेमणूकीसाठी भरलेला अर्ज व आवश्यक कागदपत्रेही पूर्णतः खरी असून त्याबाबत जर काही खोटेपणा असल्याचे सिध्द झाल्यास मी माझी नियुक्ती रदद् होईल हे जाणतो/जाणते. तसेच अशा परिस्थितीत माझ्यावर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई होऊ शकते याची मला जाणीव आहे.

माझी नेमणूक जास्तीतजास्त १७९ दिवसांसाठी असून ती मी पूर्ण करेण. मुदत पूर्व राजीनामा दिल्यास मी प्रशासकीय व आवश्यक त्या फौजदारी कारवाईस पात्र राहीन. मुदत पूर्व राजीनामा दिल्यास ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर या किंवा इतर पदांवर नेमणूक करताना माझे नाव वगळण्यात येईल व आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही केली जाईल/जाऊ शकते याची मला जाणीव आहे.

सही:-

नाव:-

दिनांक:-